**क्रमांक : ४३९१/ ई-१ कक्ष**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई — ४०००३२.
दिनांक : ९ मार्च, २०२१

**: : परिपत्रक : :**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात शुक्रवार, दिनांक १२ मार्च, २०२१ नंतर कार्यवाहीत घेतलेले सर्व प्रश्न व्यपगत करण्याबाबत**
**संदर्भ : (१) संसदीय कार्य विभागाचे पत्र क्र. विमंअ-२०२०/प्र.क्र.१४६/पाच, दि.५ फेब्रुवारी, २०२१**
**(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १८००/ई-१ कक्ष, दि. ३ फेब्रुवारी, २०२१.**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, संसदीय कार्य विभागाच्या संदर्भ क्रमांक (१) च्या तात्पुरत्या दिनदर्शिकेनुसार सोमवार, दिनांक ०१ मार्च, २०२१ ते शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ या कालावधीकरिता मा.मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता नेमून देण्यात आलेले दिवस तसेच त्या दिनांकास निश्चित केलेल्या तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या प्रती या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक याबाबतची माहिती उपरोक्त संदर्भ क्रमांक (२) च्या परिपत्रकाद्वारे सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आली होती. तथापि, गुरुवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आता सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ रोजीपर्यंत होणार आहे.

सबब, शुक्रवार दिनांक १२ मार्च, २०२१ ते शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ या कालावधीकरिता यापूर्वीच विभागाकडे पाठविण्यात आलेले सर्व प्रश्न व्यपगत करण्यात आले आहेत.

**( चंद्रभान नंदनवार )**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई प्रत्येकी (तीन प्रती)
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित

D:\d drive\Lina E1 Branch\BAC NIRNAY\परिपत्रक.doc